महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कुल सोसायटी नाशिक
द्वारा आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
आदिवासी विकास भवन, पहिला मजला, गडकरी चौक जुना आग्रा रोड नाशिक
दुरध्वनी क्रमांक २५७५६१५, २३१७९३८ फॅक्स क्रमांक २५७९२०८

दिनांक:- ०२/०३/२०२१

महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी,नाशिक अंतर्गत राज्यामध्ये कार्यान्वित असलेल्या एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल शाळेमध्ये इ.६ वी च्या वर्गामध्ये विद्यार्थ्यांना नविन प्रवेश देणे तसेच इ.७ वी ते इ.९ वी पर्यंत च्या वर्गातील विद्यार्थी रिक्त जागा भरणेकरिता प्रवेश प्रक्रिया राबविणे प्रस्तावित आहे.

सदर प्रवेश प्रक्रिया संगणकाधारित राबविण्यात येणार असून त्यासाठी इच्छूक मान्यता प्राप्त संगणक संस्थानी करावयाच्या कामाचे स्वरूप खालील प्रमाणे राहील.

१. ऑनलाईन अर्ज मागविण्यासाठी संकेतस्थळ तयार करणे.
२. संकेतस्थळासाठी लागणारा सर्व्हर व सेक्युरिटी उपलब्ध करून देणे.
३. ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून विभागनिहाय (ATC wise) विद्यार्थी यादी तयार करून देणे.
४. विभागाच्या गरजेनूसार प्राप्त माहिती मध्ये योग्य ते बदल करून विद्यार्थी याद्या संबधित अपर आयुक्त / प्रकल्प अधिकारी /शाळा यांना त्यांच्या लॉगिन मध्ये उपलब्ध करून देण्यासाठी संगणक प्रणाली बनविणे.
५. आयुक्तालय/अपर आयुक्त / प्रकल्प अधिकारी कार्यालयांच्या आवश्यकतेनुसार डॅशबोर्ड उपलब्ध करून देणे ज्यावरून प्राप्त माहितीचे विश्लेषण करता येईल. (उदा.कोणत्या विभांगांतर्गत प्रकल्पांतर्गत किती अर्ज आले,त्यापैकी इयत्तावार विद्यार्थी किती आणि विद्यार्थीनी किती इ.)
६. प्राप्त आवेदन पत्राची ऑनलाईन छाननी करून विभागाने ठरवलेल्या नियमानूसार गुणवत्ता यादी तयार करणे,तसेच शाळानिहाय विद्यार्थी गुणवत्ता व प्रतिक्षा यादी तयार करणे.
७. गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट झाल्यानंतर संबधित विद्यार्थ्यांच्या पालकास / शाळेस SMS पाठविणे.विद्यार्थ्यांची निवड कोणत्या शाळेमध्ये झाली आहे.त्याबाबतचे निवडपात्र संबधित विद्यार्थ्यांच्या लॉगिंनमध्ये उपलब्ध करून देणे.
८. राज्यातील सर्व एकलव्य शाळांना त्यांच्या शाळेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी , कागदपत्रे व अनुषंगिक माहिती शाळांच्या लॉगिंनमध्ये उपलब्ध करून देणे.
९. प्रवेश प्रक्रियेचे काम सुरू असेपर्यंत संस्थेमार्फत तांत्रिक सहकार्य उपलब्ध करून देणे.
१०. विद्यार्थी,पालक व शाळां यांना अर्ज भरतांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी वेळोवेळी दूर करण्यासाठी संस्थेमार्फत मदत कक्षाची स्थापना करणे.

Scanned with CamScanner

११.प्रवेश प्रक्रिया चालू असतांना आयुक्तालयामध्ये उपलब्ध करून दिलेल्या डँशबोर्ड वर विभागनिहाय,प्रकल्पनिहाय,शाळानिहाय विद्यार्थी रिक्त जागांचा तपशील,प्राप्त अर्ज तसेच भरलेल्या जागा इ.संदर्भातील माहिती LIVE स्वरूपात बघता येईल अशी सुविधा निर्माण करणे.

१२.वेळोवेळी विद्यार्थ्यांना SMS द्वारे माहिती पाठविण्याची व्यवस्था करणे.

१३.प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेनंतर संस्थेमार्फत तयार करण्यात आलेले SOFTWARE हे महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी नाशिक यांचेकडे हस्तांतरित करावे लागेल.

१४.संपूर्ण प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यांनतरचे सर्व अहवाल ,कागदपत्रे हे SOFTCOPY स्वरूपात विभागास जमा करवी लागेल.तरी उपरोक्त प्रमाणे नमूद केलेल्या मुद्यांप्रमाणे पूर्वानुभव असलेल्या इच्छूक संस्थांनी संपूर्ण कामासाठीची एकूण किमंत दर्शविणारे दर सर्व करांसह बंद लिफाप्यात या कार्यालयास दिनांक १०/०७/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत सादर करावेत. दरपत्रकावर प्रोप्रायटर,संस्था / कंपनी यांचा पँन क्रमांक व जी.एस.टी. एन नंबर नमूद करणे अनिवार्य राहील.

स्वाक्षरीत/-

स्थळ प्रतिवर मा.सदस्य सचिव
तथा मा.आयुक्त महोदयांची स्वाक्षरी आहे.

सदस्य सचिव
महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कुल सोसायटी,
तथा आयुक्त,आदिवासी विकास विभाग
महाराष्ट्र राज्य,नाशिककरिता

**प्रत माहितीस्तव सादर -**

मा.अध्यक्ष,महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी,नाशिक तथा प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय मुंबई - ३२

Scanned with CamScanner